तरुण भारत
Apla Nagpur | 2023-02-28 | Page- 6
epaper.tarunbharat.net

महत्त्वाचे

## आयआयएममध्ये द्विदिवसीय कृषी तंत्रज्ञान कार्यशाळा



**नागपूर** : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि आशियाई डेव्हलपमेंट बँकेच्या संयुक्त वतीने द्विदिवसीय कृषी तंत्रज्ञान कार्यशाळा आणि खरेदी-विक्रेता मेळावा नुकताच आयोजित करण्यात आला. याप्रसंगी संचालक डॉ. भीमराया मेत्री, दीपक शिंदे, अजय कडू आणि मेघा पांडेय आदी मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम मॅग्नेट प्रकल्पाचा एक भाग असून, या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना, त्यांच्या भागात उपलब्ध आधुनिक तंत्रज्ञान आणि कृषी क्षेत्रातील नव्या प्रवाहांची माहिती देणे हा मुख्य हेतू आहे. कार्यशाळा आणि खरेदीदार-विक्रेता संमेलनांची मालिका आखण्यात आली आहे. कृषी व्यवसाय, संस्थात्मक क्षमतावृद्धी, आर्थिक वाढ, एफपीओ आणि व्हॅल्यू चेन ऑपरेटर यांच्यासाठी कृषिमूल्य साखळी तसेच पायाभूत सुविधा कार्यान्वित करणे हा आयोजनामागील प्रमुख हेतू आहे. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी १४२.९ दशलक्ष डॉलर्स एवढा निधी खर्च होण्याची शक्यता आहे. त्यापैकी १०० दशलक्ष रुपयांचा निधी सामान्य भांडवली खर्च म्हणून प्रदान करण्यात आला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

Powered by iDocuments